# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

दिनांक २०-०२-२०१०

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## २०/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२६) इतिवृत्त

दि.२०/२/२०१० रोजी मा.सभापती **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे सायं. ५.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री.सतीश कटकटे
०२. श्री.रविकांत काशीनाथ गवळी
०३. श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०४. श्री. सुरे सिताराम इसराम
०५. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
०६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०७. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०८. श्रीमती मेहरून्नीसा खान
०९. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**विषय क्र. ४०५ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे आदेशानुसार उप आयुक्त (सिडको) महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, अर्जदार श्री.आनंद व्ही.देशपांडे (सेक्रेटरी), रेखा, रंग, कला ट्रस्ट, औरंगाबाद यांनी दि.१३.१.२०१० रोजी अर्ज देवून महानगरपालिकेच्या मालकीचे मौजे शहानुरवाडी (तापडीयानगर) येथील व्यायामशाळा शैक्षणिक कार्यासाठी भाडेतत्वावर मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

सदरील व्यायामशाळा भाडेतत्वावर देण्याबाबत प्रशाकीय मान्यता झालेली असून सदरील व्यायामशाळा भाडेतत्वावर देण्यास सभेत मान्यता झाल्यावर त्यानंतर भाडे समिती समोर सदरील व्यायामशाळेचे भाडे निश्चित करून घेवून व त्यानुसार संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषिक कर व इतर संलग्न कराचा भरणा संबंधीतास करावा लागेल. त्यानंतर भाडेपट्टा करारनामा करून दर तीन वर्षांनी नुतनीकरण करून घेण्यात येईल. या अटीवर व महानगरपालिकेच्या ज्या काही प्रचलीत अटी-शर्ती आहेत त्या अटीवर सदरील ठिकाणचे व्यायामशाळा संबंधीतास भाडेपट्ट्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.भगवान घडमोडे | :मा.श्री.श्रीकांत जोशी यांचे निधीतुन सदरचा हॉल तयार करण्यात आलेला आहे त्या ठिकाणी बॅडमिंटन हा खेळ खेळला जात आहे. त्यामुळे सदरील हॉल भाडयाने देण्यात येवु नये. स्थानिक नागरिकांचा तो अधिकार आहे. |
| मा.सभापती | :केअर टेकर म्हणुन कोणी आलेले आहे का? विषय क्रमांक ४०५ बाबत प्रशासनाने खुलासा करावा. |
| उपआयुक्त(सिडको) | :शहानुरवाडी तापडिया या ठिकाणी व्यायामशाळा आहे माजी आमदार श्रीकांत जोशी यांच्या फंडातुन बांधलली आहे. शैक्षणिक उपक्रमासाठी श्री.देशपांडे आनंद व्हि. यांनी मागीतलेली आहे. मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी प्रस्तावित केलेला आहे. |
| मा.सभापती | :कुठल्याही नागरीकाचा विरोध आलेला नाही. |
| श्री.रविकांत गवळी | :पुढील बैठकीत विषय घेण्यात यावा. |
| श्री.प्रशांत देसरडा | :पुढील बैठकीत सदरचा विषय घेण्यात यावा. |
| मा.सभापती | :भाडे समितीकडुन अहवाल मागविण्यात यावा. |

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार भाडे समितीकडून अहवाल मागवुन पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४०६ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला शहागंज भाजीमंडी मच्छी मार्केट श्री.जहागीर खान अब्बास खान, अध्यक्ष, महात्मा फुले भाजीपाला आडत व्यापारी संघटना, औरंगाबाद यांना भाडेतत्वावर देण्यासाठी दि.२४.११.२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीमध्ये विषय क्र.२१६ नुसार संबंधीतास सदरील मच्छी मार्केट भाडेतत्वावर देण्याबाबत अशासकीय प्रस्ताव पारीत झालेला असून त्यास मा.आयुक्त यांनी संबंधीतास एका वर्षासाठी जागा भाडेतत्वावर देण्याकरीता दि.१५.२.२०१० रोजी मान्यता दिलेली आहे.

त्याुसार संबंधीतास रू.१२३/- प्रति चौ.मी. प्रति माह आकरून भाडेतत्वावर देण्यासाठी मंजुरी झाल्यास संबंधीतांकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे रू.१४,४८०/-, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम रू.१४,४८०/-, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रति माह प्रमाणे प्रती वर्ष रू.५८९/- अकृषिक कर प्रति वर्ष रू.७५/- व इतर संलग करासह भाडेपट्टा करारनामा करून देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मायतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.प्रशांत देसरडा | :शहरातील एकेकाळी नावाजलेली मंडी होती. मंडीची एकत्रित माहिती मागविल्यास मंडीकडे लाखो रूपयांची थकबाकी बाकी आहे. एकुण ५०० ते ७०० दुकाना आहेत त्याची वसुली होते किंवा नाही. |
| मा.सभापती | :शहागंज येथील मंडीची वसुलीबाबत खुलासा करण्यात यावा. |
| मालमत्ता अधिकारी | :चालु वर्षीच्या बजेटमध्ये ३ कोटींची वसुलीचे निर्देश देण्यात आलेली आहे शहागंज मार्केटमध्ये १५८ दुकाने आहेत. मच्छीमार्केटमध्ये ०९ दुकाने आहेत. |
| श्री.सतिष कटकटे | :किती दुकाने रिकाम्या आहेत. |

मालमत्ता अधिकारी :१५८ दुकांनापैकी १५५ दुकाने भाडयाने गेलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे :नियमित भाडे वसुली व नियमान्वये दुकाने भाडयाने दिलेल्या आहेत का?

मालमत्ता अधिकारी :नगर परिषदेच्या काळापासुन ११ महिण्यांच्या भाडे तत्वावर दुकाने देण्यात आलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे :भाडेवाढ करण्यात आलेली आहे काय? जागेची पहाणी करण्यात आलेली आहे काय?

मालमत्ता अधिकारी :मच्छीमार्केटच्या बाजुची जागा आहे.

श्री.भगवान घडमोडे :भाडेवाढ किती टक्के करण्यात आलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :कमीत कमी ५ वर्षासाठी दुकाने भाडयाने देण्यात याव्यात. या संपुर्ण मार्केट कमीटीचा अहवाल तयार करण्यात यावा. किती दुकाने आहेत किती वर्षापासुन कोणत्या व्यक्तीस भाडयाने दुकाना देत आहे वसुली किती झाली आहे या सर्व बाबींची माहिती मिळेल. महानगरपालिकेच्या जागेवर एका टपरीचे भाडे पाच हजार प्रतिमाह भाडे आकारले जाते.

मा.सभापती : विषय क्रमांक ४०६,४०७ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला शहागंज भाजीमंडी मच्छी मार्केट श्री.जहागीर खान अब्बास खान, अध्यक्ष, महात्मा फुले भाजीपाला आडत व्यापारी संघटना, औरंगाबाद यांना स्थायी समिती सभा ठराव क्र.२१६ दि.२४/११/२००९ च्या अनुषंगाने सभागृहात झालेल्या चर्चेुसार संबंधीतास जुन्या दरामध्ये काही प्रमाणात वाढ करून भाडे आकारणी करून इतर नेहमीच्या अटी-शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वाुमते मंजुरी देण्यात येते.

वैधाकि कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०७ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त (सिडको), औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मो.शहागंज भाजीमंडी मच्छी मार्केटच्या बाजुस असलेली ०९ व्यक्तींना विविध व्यवसायासाठी दुकाने भाडेपट्ट्यावर देण्यात आलेली होती. परंतु दिनांक १६.६.२००८ रोजी महाागरपालिकेतर्फे सदरील दुकाने निष्काशीत करण्यात आली होती. परंतु दिाांक २१.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.१२४ नुसार संबंधीतास सदरील ठिकाणी ११x९.६ चौ.फुट (९.८१ चौ.मी.) या आकाराची जागा भाडेपट्ट्यावर देण्याबाबत अशासकीय प्रस्ताव पारीत झालेला असू त्यास मा.आयुक्त यांनी संबंधीतास एका वर्षासाठी जागा भाडेतत्वावर देण्याकरीता दि.१५.२.२०१० रोजी मान्यता दिलेली आहे.

त्याुसार खालील प्रमाणे ०९ व्यक्तींना रू.१२३/- प्रति चौ.मी. प्रतिमाह आकारून भाडेपट्ट्याने देणे योग्य.

१. श्री.मानोहर राधाकिसन क्षिरसागर

२. श्री.करीम खान भिकन खान

३. श्री.मोहंमद अय्युब मोहंमद इब्राहीम

४. श्री.अब्दुल शकील अब्दुल कदीर सिद्यीकी

५. श्री.शेख हमीद शेख समद

६. श्री.अब्दुल वाहेद अब्दुल हक

७. श्री.अवर खान अब्बास खान

८. श्री.आदील खान अब्बास खान

९. श्री.अब्बास खान वाहेद खान

करीता वरील प्रमाणे संबंधीतास सदरील ठिकाणी जागा भाडेतत्वावर देण्यासाठी मंजुरी झाल्यास सर्व संबंधीतांकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे रू.१४,४८०/-, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम रू.१४,४८०/-, सेवा शुल्क रू.५/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे प्रती वर्ष रू.५८९/- अकृषीक कर प्रती वर्ष रू.७५/- व इतर संलग करासह भाडेपट्टा करारानामा करून देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

| | |
|---|---|
| श्री.सिताराम सुरे | :विषय क्रमांक ४०७ दोन महिण्यांपुर्वीच्या बैठकीत रद्द करण्यात आलेला आहे. सदरचा विषय रद्द करण्यात यावा. विषय क्रमांक ४०७ वर खुलासा करण्यात यावा. त्यानंतर सदरचा विषय कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा. |
| मा.सभापती | :स.सदस्य ज्या प्रस्तावाबाबत सांगत आहे तो प्रस्ताव दुसरा आहे. त्या प्रस्तावाचा हया प्रस्तावाशी संबध नाही. प्रशासनाने खुलासा करावा कि स्थायी समितीने रद्द केलेला प्रस्ताव विषय क्रमांक ४०७ आहे का? |
| उपआयुक्त(सिडको) | :यापुर्वी मा.स्थायी समितीने रद्द केलेला प्रस्ताव वेगळा आहे. |
| श्री.सिताराम सुरे | :प्रशासनाने खुलासा करावा. |
| मा.सभापती | :पुन्हा खुलासा करण्यात यावा. स.सदस्य श्री.सुरे यांच्या म्हणण्यानुसार पुर्वी स्थायी समितीने प्रस्ताव रद्द केला होता तो पुन्हा कसा आला. |
| उपआयुक्त(सिडको) | :यापुर्वी जो प्रस्ताव रद्द केला तो दवाखाण्याच्या बाजुच्या लाईनीचा प्रस्ताव रद्द केलेला आहे. सदरचा प्रस्ताव हा मच्छीमार्केटचा आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :स्थायी समितीने तीन ठराव ठेवलेले होते, एक रद्द झालेला आहे दोन स्थायी समितीसमोर प्रस्ताव आलेले आहे. प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. |
| मा.सभापती | :विषय क्रमांक ४०६,४०७ मंजूर करण्यात येतो. जुन्या भाडेच्या रेट प्रमाणे भाडे आकारणी करण्यात यावी. जुन्या भाडेच्या ५० पट वाढवुन प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मो.शहागंज भाजीमंडी मच्छी मार्केटच्या बाजुस असलेली दुकाने दिनांक १६.६.२००८ रोजी महाागरपालिकेतर्फे सदरील दुकाने निष्काशीत केल्यामुळे, स्थायी समिती सभा ठराव क्र.१२४ दि.२१/१०/२००८ च्या अनुषंगाने सभागृहात झालेल्या चर्चेुसार प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.०१ ते ०९ या व्यक्तींना जुन्या दरामध्ये काही प्रमाणात वाढ करून भाडे आकारणी करून इतर नेहमीच्या अटी-शर्ती नुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधाािक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०८ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांनी दि.१.१२.२००९ रोजी विनंती अर्ज देवून महानगरपालिकेच्या मालकीचे मो.जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्बल मधील हॉल भाडेपट्ट्यावर मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

न.भु.क्र.१७८०४ सिटी मार्बलच्या इमारती मधील पहिल्या मजल्यावरील हॉलचे क्षेत्रफळ ११८.८४५ चौ.मी. साठी सिध्द शिघ्र गणकानुसार प्रति चौ.मी. प्रति माह रक्कम रू.२०९/- (प्रती माह भाडे रू.२४,८३९/-, प्रती वर्ष भाडे रू.२,९८,०६८/-) आकारणे योग्य व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर आकारून महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार भाडेपट्ट्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : रद्द करण्यात येतो.

श्री.रविकांत गवळी : विषय क्रमांक ४०८ मंजूर करण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. ४०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८५ गारखेडा अंतर्गत विविध ठिकाणी १००, १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी म.जी.प्रा. विभागाची सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रूपये १४,४४,४००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास मा.स्थायी समितीचा ठराव क्र.२२१ दि.४.१२.२००९ अन्वये मान्यता झालेली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे वॉर्ड-फ पाणी पुरवठा या लेखाशिर्षा मधून करण्यात येणार आहे.

कार्यालयाची निविदा सुचना जा.क्र.७१/२००९ दि.१०.१२.२००९ अन्वये बी-१ निविदा ई-निविदा मार्फत मागविण्यात आल्या. निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेस व निर्धारीत वेळेपर्यंत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.अब्दुल खालेक अब्दुल रहेमान | १०.७८% कमी |
| २. | मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स | ९.९९% कमी |
| ३. | श्री.एस.बी.साधवानी | ९.५% कमी |
| ४. | श्री.पी.बी. पाटील | ३.४२% कमी |

वरील प्रमाणे चार निविदा प्राप्त असून तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा ही श्री.अब्दुल खालेक अब्दुल रहेमान यांची असून त्यांनी अं.प.दरापेक्षा १०.७८% कमी असा दर दिलेला आहे.

करीता श्री.अब्दुल खालेक अब्दुल रहेमान यांची अं.प.दरापेक्षा १०.७८% कमी दराची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : विषय क्रमांक ४०९, ४१०मंजूर करण्यात यावा. प्रशासनाकडुन खुलासा आलेला आहे, रद्द करण्याचे कारण काय आहे.

मा.सभापती : ऐनवेळीचे सर्व विषय मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८५ गारखेडा अंतर्गत विविध ठिकाणी १००, १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १०.७८% कमी दराची श्री.अब्दुल खालेक अब्दुल रहेमान यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.१३, विश्वासनगर, एन-१२ अंतर्गतच्या जुन्या रस्त्यावर विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१५,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पुनःडांबरीकरण (Re-surfacing) करणे या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती विषय क्र.१८७ दि.२४.११.२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा मागविले असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या व तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | २४.९९% कमी दराने |
| २. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | १९.९९% कमी दराने |
| ३. | श्री.एम.ए.सिद्यीकी | १५.८% कमी दराने |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९९% कमी दराची निविदा श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची असून ५% अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेणेस आणि (Defect Libility Period) तीन वर्षासाठी राहिल. या अटीवर मान्यता दिली आहे.

करीता श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची २४.९९% कमी दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१३, विश्वासनगर, एन-१२ अंतर्गतच्या जुन्या रस्त्यावर विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९९% कमी दराची श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग याचे निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, दिनांक ९/२/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी सति सभागृहाने ठराव क्र.२०३ अन्वये दिनांक १/३/२००९ ते २८/२/२०१० या कालावधीसाठी निविदेतील मंजुर देकार रक्कम रू.१२४.२९ कोटी मध्ये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात व रहदारी फी वसुलीकरीता मे.सहकार एजन्सीज प्रा.लि., मालाड, मुंबई यांची जकात संकलन अभिकर्ता म्हणून नियुक्ती केलेली आहे.

परंतु शासन अधिसूचना क्र./स्थासंक-०२०९/प्रक्र.५९(अ)/०९ नवि-३४ दि.१/१/२०१० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ (१९४९ चा मुंबई-५९) च्या कलम-१२४ च्या उपकलम-(२) च्या खंड (ककक) मधील तरतुदीद्वारे महाराष्ट्र शासनाने राज्यातील १६ 'ड' वर्ग महानगरपालिकेमध्ये समावेश असलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आयात होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर दि.०१ एप्रिल २०१० पासून "स्थानिक संस्था कर" (Local Body Tax) बसविण्याचे निर्देश दिलेले आहेत.

वरिल बाबी लक्षात घेता औरंगाबाद महानगरपालिकेची जकात संकलन अभिकर्ता यांची दि.२८/२/२०१० रोजी मुदत संपुष्टात येत आहे. यामुळे माहे मार्च-२०१० या एका महिन्याच्या कालावधीसाठी जकात कराची वसूली महानगरपालिका प्रशासना मार्फत अथवा जकात संकलन अभिकर्ता यांना एक महिन्याची मुदतवाढ देणे आवश्यक आहे. जर महानगरपालिका प्रशासनाकडून

एक महिन्याची जकात कराची वसूली करावयाची झाल्यास सद्य:स्थितीत सर्व वार्ड कार्यालयात मालमत्ता व पाणीपट्टी कर वसूलीसाठी कर्मचाऱ्यांची नितांत आवश्यकता आहे. माहे मार्च २०१० हा महिना वसूलीच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने जकात कर वसूलीसाठी एका महिन्याकरिता मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याने मनपाच्या इतर वसूलीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्य:स्थितीत कार्यरत असलेले जकात संकलन अभिकर्ता यांना सन २००९-२०१० या वर्षासाठी दि.१८/२/२००९ रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तींच्या अधिन राहून दि.१/३/२०१० ते ३१/३/२०१० या एक महिन्याच्या कालावधीसाठी मा.स्थायी समिती सभागृहाने मंजूर केलेला ठराव क्र.२०३ दिनांक ९/२/२०१० मधील मंजूर दराच्या प्रमाणात मुदतवाढ देण्यासाठी व तसेच दिनांक १ एप्रिल २०१० पासून स्थानिक संस्था कर लागू होणाऱ्या निर्णयात पुढील काळात शासनाकडून बदल झाल्यास धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात व रहदारी फी वसुलीकरीता मे.सहकार एजन्सीज प्रा.लि., मालाड, मुंबई यांची जकात संकलन अभिकर्ता म्हणून नियुक्ती केलेली असल्याने सद्य:स्थितीत कार्यरत असलेले जकात संकलन अभिकर्ता यांना सन २००९-२०१० या वर्षासाठी दि.१८/२/२००९ रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तींच्या अधिन राहून दि.१/३/२०१० ते ३१/३/२०१० या एक महिन्याच्या कालावधीसाठी स्थायी समिती ठराव क्र.२०३ दिनांक ९/२/२०१० मधील मंजूर दराच्या प्रमाणात मुदतवाढ देण्यास तसेच "स्थानिक संस्था कर" लागू होणाऱ्या निर्णयात पुढील काळात शासनाकडून बदल झाल्यास, आवश्यक असल्यास नविन निविदेस मंजुरी मिळेपर्यंत सध्या कार्यरत असलेले जकात संकलन अभिकर्ता यांना मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१२ :**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२४ मधील चिकलठाणा औद्योगिक वसाहती अंतर्गत रस्ते दुरूस्ती/पॅचवर्क भाग २ या कामाच्या रक्कम रू.४९,९९,९००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.७२१ दि.७.११.२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाली असून त्यानुसार मा.स्थायी समिती विषय क्र.२५९ दि.२२.१२.२००९ अन्वये सदरील कामासाठी यापुर्वी प्राप्त राजेंद्रसिंग अजितसिंग यांची ३४.९९% कमी दराची निविदा फेटाळण्यात आली असून अल्पमुदतीची फेरनिविदा मागविणे बाबत मान्यता झालेली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी फेरनिविदा मागविण्यात आली असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ड्रिमलॅन्ड कन्स्ट्रक्शन | २६.७५% कमी दराने |
| २. | राजेंद्रसिंग अजितसिंग | २.०३% कमी दराने |
| ३. | चांदराम आशन्ना | १.००% कमी दराने |
| ४. | के.बी.पाथ्रीकर | २.००% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा (अं.प.दरापेक्षा २६.७५% कमी) ड्रिमलॅन्ड कन्स्ट्रक्शन यांची असून सदर निविदेस मा.आयुक्त यांची दि.१८.२.२०१० रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. एमआयडीसी चिकलठाणा येथील रस्ते दुरूस्त करणे बाबत मा.उच्च न्यायालयात याचिका सुनावणीस निघाली आहे. मा.उच्च न्यायालयाने यापुर्वीच रस्ते दुरूस्ती बाबतची माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जास्तीत जास्त रस्ते दुरूस्ती करणे गरजेचे आहे. प्राप्त निविदा अं.प.दरापेक्षा कमी

दराची असल्यामुळे या कामात रक्कम रू.१३,३७,४६७/- इतकी बचत होत आहे. प्रस्तावित रस्त्याव्यतिरिक्त खराब झालेल्या इतर रस्त्याचे पॅचवर्क करण्यासाठी बचतीची रक्कम रू.१३,३७,४६७/- वापरण्यास परवानगी होणे अपेक्षित आहे. या परवानगीसह तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा २६.७५% कमी दराची ड्रिमलॅन्ड कन्स्ट्रक्शन यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२४ मधील चिकलठाणा औद्योगिक वसाहती अंतर्गत रस्ते दुरूस्ती/पॅचवर्क भाग २ या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २६.७५% कमी दराची निविदा स्विकारणेस तसेच प्राप्त निविदा अं.प.दरापेक्षा कमी दराची असल्यामुळे होणाऱ्या बचतीमधून प्रस्तावित रस्त्याव्यतिरिक्त खराब झालेल्या इतर रस्त्याचे पॅचवर्क करण्यासाठी बचतीची रक्कम रू.१३,३७,४६७/- वापरण्यास परवानगी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्त्री व पुरूष कर्मचारी यांना देय असलेल्या गणवेशाकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण ०४ निविदा प्राप्त झाल्या असून, निविदाधारक पुढील प्रमाणे आहेत.

(१)क्रिश इंटरनॅशनल (२)टेक्नोट्रेड (३)अभय ट्रेडर्स (४) रोशन सेल्स कार्पोरेशन

प्राप्त निविदा दर हे जास्त असल्याने निविदाधारकांना वाटाघाटीकरीता बोलावण्यात आले. दि.१८/२/२०१० रोजी केंद्रीय खरेदी समितीची बैठक झाली. यावेळी उपरोक्त निविदाधारक उपस्थित होते. वाटाघाटीअंती पुरूष कर्मचारी गणवेश हे प्राप्त दरात ३% दर कमी करून येणाऱ्या दरात मे.क्रिश इंटरनॅशनल यांचेकडून आणि स्त्री कर्मचारी गणवेशातील साडी हे साहित्य प्राप्त दरात ४०% कमी करून येणाऱ्या दरात आणि ब्लाऊज पीस, शर्ट सलवार व ओढणी कापड या साहित्याच्या प्राप्त दरात ३०% दर कमी करून येणाऱ्या दरात मे.रोशन सेल्स कार्पोरेशन यांचेकडून खरेदी करण्यास समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार पुरूष कर्मचारी गणवेश कापडाकरीता रू.१७,८४,८९७/- व स्त्री कर्मचारी गणवेशाकरिता रू.६,६७,६५०/- असा एकूण रू.२४,२२,५४७/- एवढा खर्च येत आहे.

यावर्षी कर्मचारी गणवेश व इतर साहित्याकरिता रू.३० लक्ष तरतूद करण्यात आली होती. हिवाळी प्रावरणांकरीता रू.१७.१५ लक्ष खर्च झालेला ाहे. तसेच कर्मचाऱ्यांची शिलाई देय आहे. या सर्व बाबींचा विचार करता, अतिरिक्त रू.२२ लक्ष तरतूद उपलब्ध करून देण्यासह प्रस्ताव रू.२४,२२,५४७/- च्या खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्त्री व पुरूष कर्मचारी यांना देय असलेल्या गणवेशाकरीता प्राप्त निवदा व केंद्रीय खरेदी समितीच्या शिफारशीप्रमाणे वाटाघाटीअंती ठरल्यानुसार पुरूष कर्मचारी गणवेश हे प्राप्त दरात ३% दर कमी करून येणाऱ्या दरात मे.क्रिश इंटरनॅशनल यांचेकडून आणि स्त्री कर्मचारी गणवेशातील साडी हे साहित्य प्राप्त दरात ४०% कमी करून येणाऱ्या दरात व ब्लाऊज पीस, शर्ट सलवार व ओढणी कापड या साहित्याच्या प्राप्त दरात ३०% दर कमी करून येणाऱ्या दरात मे.रोशन सेल्स कार्पोरेशन यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच पुरूष कर्मचारी गणवेश व स्त्री कर्मचारी गणवेशाकरिता लागणाऱ्या एकूण रू.२४,२२,५४७/- एवढ्या खर्चास अतिरिक्त रू.२२ लक्ष तरतूद उपलब्ध करून देण्यासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, १२ व्या वित्तीय आयोग फंडाअंतर्गत शहरातील खालील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | एन-५पाण्याची टाकी ते बजरंग चौक- सदर रस्ता सिडकोतर्फे करण्यात आलेला आहे. हस्तांतरणानंतर सदर रस्त्याचे काम झालेले नाही. | अं.प.र.रू.६९,९८,६००/- |
| २. | कलेक्टर ऑफिस ते मजनूहिल रस्ता-सदर रस्ता सन १९९८ मध्ये विकसित करण्यात आलेला आहे. त्यानंतर फक्त Patchwork चे काम झालेले आहे. सध्या रस्ता संपूर्ण विकसित करण्याची आवश्यकता आहे. | अं.प.र.रू.५९,९७,३००/- |
| ३. | महावीर चौक ते रेल्वेस्टेशन - सदर रस्त्याचे २००२-२००३ मध्ये Resurfacing चे काम झालेले आहे. | अं.प.र.रू.९४,४६,८००/- |
| ४. | अंजली सिनेमा ते अंगुरीबाग - सदर रस्ता सन १९९८ मध्ये पूर्ण विकसित केलेला आहे. त्यानंतर त्यावर फक्त Patchwork चे काम झालेले आहे. | अं.प.र.रू.३९,९९,९९०/- |
| | एकूण :- | अं.प.र.रू.२,६४,४२,९९६/- |

उक्त कामांची एकत्रित निविदा प्रसिध्द केली असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण ०४ निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.एम.ए.सिद्यीकी | ४.८६% जास्त दराने |
| २. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | ५.२८% जास्त दराने |
| ३. | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन | ५.४३% जास्त दराने |
| ४. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ६.००% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा ४.८६% जास्त दराची निविदा मे.एम.ए.सिद्यीकी यांची आहे. सदरील दर जास्त प्रमाणांत असल्याने मा.आयुक्त महोदय यांनी समक्ष वाटाघाटी केली असता, वाटाघाटीअंती सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.००% कमी दराने काम करण्यास संमती दर्शविली असून, मा.आयुक्त महोदय यांनी ७.००% कमी दराची शिफारस केली आहे.

तरी मे.एम.ए.सिद्यीकी यांचे ७.००% कमी दराची निविदा विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १२ व्या वित्तीय आयोग फंडाअंतर्गत शहरातील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामाकरीता प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र. ०१ ते ०४ या रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.एम.ए.सिद्यीकी यांचेकडून अं.प.दरापेक्षा ७.००% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१५ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड-ब सिडको परिसरातील मुख्य विकास योजना रस्त्याच्या दुरूस्तीसह पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.२,९९,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.७४३ दिनांक ७.११.२००९ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. या अंदाजपत्रकामध्ये सिडको वॉर्ड-ब परिसरातील डॉ.पवार हॉस्पीटल ते जळगांव रस्ता, टी.व्ही.सेंटर ते मजनूहिल, टी.व्ही.सेंटर ते हडको कॉर्नर, एन-७ देवगिरी बँक ते आझाद चौक, मयूरनगर एन-११ आणि यादवनगर एन-११ इत्यादी रस्त्यांचा समावेश आहे.

मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार या कामासाठी ई-निविदा विभागातर्फे निविदा कार्यवाही केली असता, चार र्विदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मस्कट कन्स्ट्रक्शन | ४.५५% अं.प.दरापेक्षा जास्त दराने |
| २. | एम.ए.सिद्यीकी | ५.२५% अं.प.दरापेक्षा जास्त दराने |
| ३. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ६.००% अं.प.दरापेक्षा जास्त दराने |
| ४. | ए.एस.कन्स्ट्रक्शन | ६.९०% अं.प.दरापेक्षा जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५५% जास्त दराची निविदा मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राप्त झाली होती. सदर एजन्सीस दराच्या वाटाघाटीसाठी बोलविले असता, वाटाघाटीअंती एजन्सीने अं.प.दरापेक्षा ४.५५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी दराने काम करण्यास सहमती दिली आहे. त्यानुसार मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची सर्वात कमी दराची निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर सादर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करिता वरील प्रमाणे मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : ७% कमी दरामुळे रू. ८० लक्ष बचत होते त्यात वॉर्ड ब व क मधील रस्त्यांची कामे मंजूर दराने याच निविदापैकी मस्कट कन्स्ट्र. यांचेमार्फत मंजूर दरानुसार ५-२-२ तातडीने करण्यात यावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-ब सिडको परिसरातील मुख्य विकास योजना रस्त्याच्या दुरूस्तीसह पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा ७.००% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच क्र.४१३ ते ४१७ या विषयांतर्गत र.रू.११.१४ कोटींच्या निविदाचे ७% कमी दरामुळे रू. ८० लक्ष बचत होते त्यात वॉर्ड ब व क मधील रस्त्यांची कामे मंजूर दराने मुं. प्रां. मनपा अधि.१९४९ अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये मस्कट कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत तातडीने करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४१६ :</u>**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहरातील बी.आर.जी.एफ. अंतर्गत विविध रस्त्याचे मजबुतीकरण व पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.३,१४,१५,६५५/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.७३८ दिनांक ७/११/२००९ अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा विक्री

झाल्या निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ४.५१% जास्त दराने |
| २. | श्री.एम.ए.सिद्यीकी | ६.०१% जास्त दराने |
| ३. | मे.मॉस्कोट कन्स्ट्रक्शन कंपनी | ६.७८% जास्त दराने |
| ४. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | ७.२०% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे निविदांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५१% जास्त असे आहेत.

उपरोक्त दर जास्त वाटत असल्याने मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन हे सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५१% जास्त ऐवजी ७.००% कमी दराने करण्यास तयार आहेत.

तरी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.००% कमी दर मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील बी.आर.जी.एफ. अंतर्गत विविध रस्त्याचे मजबुतीकरण व पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.००% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहरातील १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत वॉर्ड ई व फ मधील विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२,३६,१७,३१९/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.८५७ दिनांक २१/१२/२००९ अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खाील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | ४.६६% जास्त दराने |
| २. | श्री.एम.ए.सिद्यीकी | ५.२०% जास्त दराने |
| ३. | मे.मॉस्कोट कन्स्ट्रक्शन कंपनी | ५.३५% जास्त दराने |
| ४. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ६.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचे निविदांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.६६% जास्त असे आहेत.

उपरोक्त दर जास्त वाटत असल्याने मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांना सदर कामाचे दराबाबत वाटाघाटीस बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन हे सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.६६% जास्त ऐवजी ७.००% कमी दराने करण्यास तयार आहेत.

तरी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.००% कमी दर मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत वॉर्ड ई व फ मधील विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.००% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२९ गणेश कॉलनी अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज देखभाल दुरूस्तीची कामे करणे, गणेशकॉलनी कें.प्रा.शाळाजवळ कॉंक्रेटींग करणे, मजनुहिल येथे कॉंक्रेटींग करणे ही कामे तातडीने करण्याबाबत संबंधीत प्रभागाचे नगरसेवक यांची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.९८२ दि.२५.१.२०१० नुसार उपलब्ध तरतुदीस अधीन राहून खालील दर्शविलेली कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१.वॉर्ड क्र.२९ गणेश कॉलनी दैनंदिन ड्रेनेज देखभाल दुरूस्तीची कामे करणे- २.५० लक्ष
२. वॉर्ड क्र.२९ गणेश कॉलनी मनपा कें.प्रा.शा. जवळ कॉंक्रेटींग करणे - २.५० लक्ष
३. वॉर्ड क्र.२९ मध्ये मजनुहिल येथे कॉंक्रेटींग करणे - २.५० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२९ गणेश कॉलनी अंतर्गत दैनंदिन ड्रेनेज देखभाल दुरूस्तीची कामे करणे, गणेशकॉलनी कें.प्रा.शाळाजवळ कॉंक्रेटींग करणे, मजनुहिल येथे कॉंक्रेटींग करणे ही कामे तातडीने करण्याबाबत संबंधीत प्रभागाचे नगरसेवक यांची मागणी असल्याने व मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.९८२ दि.२५.१.२०१० नुसार उपलब्ध तरतुदीस अधीन राहून खालील दर्शविलेली कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१.वॉर्ड क्र.२९ गणेश कॉलनी दैनंदिन ड्रेनेज देखभाल दुरूस्तीची कामे करणे- २.५० लक्ष
२. वॉर्ड क्र.२९ गणेश कॉलनी मनपा कें.प्रा.शा. जवळ कॉंक्रेटींग करणे - २.५० लक्ष
३. वॉर्ड क्र.२९ मध्ये मजनुहिल येथे कॉंक्रेटींग करणे - २.५० लक्ष

प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**विषय क्र. ००० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.१२ जयभिमनगर, आसेफिया कॉलनी येथे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१५,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पुनःडांबरीकरण (Re-surfecing) करणे या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती ठाव क्र.१८६ दि.२४.११.२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा मागविले असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | १६.९९% कमी दराने |
| २. | श्री.एम.ए.सिद्यीकी | अंदाजपत्रकीय दराने |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराची निविदा मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची असून ५% अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेणे आणि (Defect Libility Period) तीन वर्षासाठी राहील या अटीवर मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

करीता मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची १६.९९% कमी दराची निविदा मंजूरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१२ जयभिमनगर, आसेफिया कॉलनी येथे पुनःडांबरीकरण करणे या कामा साठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा १६.९९% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचे निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ००० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९६ मधील मध्यवस्तीतून वाहणारा नाला एमआयडीसी तून येत असल्याने तेथील कंपनीमधील केमीकल या नाल्यातून वाहत असल्याने माझ्या वॉर्डातील रहिवासीयांना श्वास घेण्यास फार त्रास होत आहे. याबाबत दि.१७.२.२०१० स्थानिक न्युज चॅनल एमसीएन मध्ये दाखविण्यात आलेले आहे, काही रहिवासीयांना घाटी हॉस्पीटल मध्ये दाखल करण्यात आलेले आहे. येथे भिषण प्राणहानी होऊ नये म्हणून नाल्याची साफसफाई व त्या संदर्भात विविध कामे करणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. नाल्याचे साफसफाईचे काम विशेष बाब म्हणुन मंजुर करण्यात यावे व सदरील काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर त्वरीत करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : खान मेहरून्नीसा हमीद खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९६ मधील मध्यवस्तीतून वाहणारा नाला एमआयडीसी तून येत असल्याने तेथील कंपनीमधील केमीकल या नाल्यातून वाहत असल्याने वॉर्डातील रहिवासीयांना श्वास घेण्यास फार त्रास होत असल्यामुळे नाल्याची साफसफाई व त्या संदर्भात विविध कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून सदर नाल्याचे साफसफाईचे काम विशेष बाब म्हणून करून घेण्यास व सदरील काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २

(२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर त्वरीत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ००० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९० अंतर्गत एकनाथनगर येथे जुने फिटींग काढून उर्जा बचत पथदिवे लावणे प्रस्तावित असून या कामाकरीता संबंधीत विभागाकडून ३,४९,८१८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७२८ अन्वये निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सिताराम सुरे    अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९० अंतर्गत एकनाथनगर येथे जुने फिटींग काढून उर्जा बचत पथदिवे लावणेचे र.रू. ३,४९,८१८/- चे अंदाजपत्रकानुसार व मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७२८ अन्वये निधी उपलब्ध करून दिल्याप्रमाणे सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ००० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. १२ अंतर्गत दैनंदिन व अत्यावश्यक किरकोळ फुटकळ कामे करणे प्रस्तावित असून या कामाकरीता मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७१३ दि.७.११.२००९ अन्वये निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान    अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १२ अंतर्गत दैनंदिन व अत्यावश्यक किरकोळ फुटकळ कामे करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७१३ दि.७.११.२००९ अन्वये निधी उपलब्ध करून दिल्यानुसार सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.